(Marathi)

1032
9/81

1363 167 P


No. 7 M.

1363
Mar

# राष्ट्रीय पद्यावली

## ( प्रभात फेरींचीं गाणीं )

भाग १ ला



सुधारून वाढविलेली

द्वितियावृत्ति

किंमत १ आणा.

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED
21 NOV. 1930

# प्रस्तावना

पहिली आवृत्ति प्रसिद्ध करून अवघे आठ दिवसहि झालें नाहींत तोंच दुसरी आवृत्ति काढण्याचा सुप्रसंग यावा ही खरोखर अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. उत्साही जनतेच्या मागणीमुळें घाई झाल्याकारणानें पहिल्या आवृत्तींत बऱ्याच नजर चुका राहिल्या. त्या दुसऱ्या आवृत्तींत सुधारल्या आहेत व चार नवीन गाण्यांची भर केली आहे. या आवृत्तीसहि जनतेकडून पहिल्या आवृत्तीप्रमाणें अनपेक्षित पाठिंबा मिळाल्यास लवकरच दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा उद्देश आहे. ज्या कविबंधूंनीं या पुस्तकांतील काव्यें रचिलीं आहेत त्यांचीं नांवें उपलब्ध झालीं तेवढी घातलीं आहेत परंतु ज्यांचीं नांवें अपरिहार्य कारणास्तव मिळणें शक्य झालें नाहीं त्यांनीं त्यांचीं नांवें प्रसिद्ध न केल्याबद्दल क्षमा करावी.

प्रकाशक.

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1363
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

## पद १ लें.

वंदे मातरम् ।
सुजलां, सुफलां, मलयजशीतलाम् ।
शस्यश्यामलां मातरम् ॥ वंदे ॥
शुभ्र ज्योत्स्नां पुलकितयामिनीम्
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम्
सुखदां वरदां मातरम् ॥ वंदे ॥

## पद २ रें.

अय मातृभूमि तेरे चरणोमें शीर नमाऊं ।
मैं भक्ति भेट अपनी तेरी शरणमें लाऊं ॥ धृ० ॥
माथेपै तू हो चंदन, छातीपै तूं हो माला ।
जिव्हापै गीत तू हो, मैं तेरा नाम गाऊं ॥ १ ॥
जिससे सुपूत उपजे गांधी तिलक जैसे ।
उस तेरि धूलिको मै निज शीस पै चढाऊं ॥ २ ॥
मानो समुद्र जिसकी धूलीका पान करके ।
करता है मान तेरा, उस पैरको मनाऊं ॥ ३ ॥
वे देश मानवाले चढकर उतर गये सब ।
गोरे रहे न काले, तुझकोहि एक पाऊं ॥ ४ ॥
सेवामें तेरि सारे भेदों को भूल जाऊं ।
वह पुण्यनाम तेरा प्रतिदिन सुनूं सुनाऊं ॥ ५ ॥
तेरेहि काम आऊं, तेराहि मंत्र गाऊं ।
मन और देह तुजपर बलिदान मैं चढाऊं ॥ ६ ॥

## पद ३ रें.

राष्ट्रीय झेंडा फडकत आला । हरहर महादेव बोला ॥
तीन रंगींचा राष्ट्रिय झेंडा आलों घेवोनीं ॥
या झेंड्याचें रक्षण करण्या विसरूं नका कोणी ॥
प्रभातवेळा मंगलदायीं जागे व्हा आतां ॥
साखरझोंपा कसल्या घेता राष्ट्र जळत असतां ॥
नेहरू गांधी लढती मिठागरीं स्वातंत्र्यासाठीं ॥
लढतां लढतां दोघेही पडले शत्रूच्या हातीं ॥
खादी वापरा देश उद्धरा स्वातंत्र्या गांठा ॥
दारू सोडा कां पीता तो नरकाचा सांठा ॥
थोर विभूति व्रत हें उचला राष्ट्रकार्य आहे ॥
घ्या त्या प्रभूचें नाम एकदां राष्ट्र सोडवाहे ॥
चला वंदूं या प्रातःकालीं राष्ट्रिय झेंड्याला ॥
हीच विनंती करितों आह्मी याहो लढण्याला ॥

## पद ४ थें.

उठा हो मर्द युवकांनों । उठा हो हिंद बालांनों ॥
उठा हो वृद्ध तरुणांनों । उठा हो आर्य भगिनींनों ॥ १ ॥
लागली आग देशाला । घोरतां तरिही या काला ॥
पुढारी आज जो झाला । मिळे त्या बंदिवासाला ॥ २ ॥
कुणाचे बंधु वा पुत्र । कुणाचे तात वा मित्र ॥
पकडिले आज सर्वत्र । मांडीले घोर हे सत्र ॥ ३ ॥
तयाची लाज कोणाला । जागवा स्वाभिमानाला ॥
पूर्वजा स्मरुनि व्हा आज । सामना द्यावया सज्ज ॥ ४ ॥

आठवा नंदबाळाला । आठवा राय शिवबाला ।
आठवा लोकमान्याला । महात्मा गांधी जय बोला ॥ ५ ॥
पाळुनी गांधी आज्ञेला । वापरा खादी या काला ॥
स्वदेशी वापरायाला । शरम कां हिंद पुत्राला ॥ ६ ॥
बांगड्या बाण हे सतिचे । विदेशी वापरायाचे ॥
विटंबन हिंदु धर्माचें । त्यजावें भगिनीनो साचे ॥ ७ ॥
तुह्माला पाहिजे सत्ता । आळसा द्या तरी लत्ता ॥
उद्यमा आंगिकारितां । येई स्वातंत्र्य ह्मणी हाता ॥ ८ ॥
विदेशी वस्तू अस्पर्श । वापरी तोची अस्पृश्य ॥
बहिष्कारोनी परदेशी । स्वराज्या स्थापूं या देशी ॥ ९ ॥

कविः—द. सी. जोशी

## पद ५ वें.

### ( महात्माजींचें आवडतें पद )

वैष्णव जन तो तेने कहिये जे पीड पराई जाणे रे
परदुःखे उपकार करे तोये, मन अभिमान न आणे रे
सकळ लोकमां सहुने वंदे, निंदा न करे केनी रे
वाच काछ मन निश्चळ राखे, धन धन जननी तेनी रे
समदृष्टि ने तृष्णात्यागी, परस्त्री जेने मात रे
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथ रे
मोह माया व्यापे नहि जेने, दृढ वैराग्य जेना मनमां रे
रामनामशुं ताळी लागी, सकळ तीरथ तेना तनमां रे
वनलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध निवार्यां रे
भणे नरसैंयो तेनुं दरशनं करतां, कुळ एकोतेर तार्यां रे

## पद ६ वें.

उठा बंधुनों उठा भगिनिनों झोप पुरे आतां ।
खंति न वाटे कशि जीवाला जरि बसती लत्ता ॥
देशामाजी कहर गुजरला पारतंत्र्य जहरें ।
हालाहलही परदास्याहुनी आजि प्राशितां बरें ॥
पहाटवेलां मंगलदायी जागे व्हा आतां ।
साखर झोंपा कसल्या घेतां राष्ट्र जळत असतां ॥
खादी वापरा देश उद्धरा स्वातंत्र्या गांठा ।
दारु सोडा कां पीता तो नरकाचा साठा ॥
या दारूनें कहर मांडिला देश हीन बनला ।
व्यसने सोडा फॅशन सोडा तारा देशाला ॥
देश आमुचा हाय तयाचा मालक आंग्ल ठरे ।
परि परमेशा बहुत दिवस हे रुचेल केंवि बरें ॥

## पद ७ वें.

कधीं प्रभुवरा परम सुमंगल । स्वातंत्र्याची पहाट होइल॥ध्रु॥
कलह कुटाळ्या या किंकाळ्या । लोप पावुनि शांत राहातिल॥
गोऱ्या लोकांचे हे चाळे । जिथल्या तेथें मुकाट जिरतिल ॥
राष्ट्रैक्याचें ढोल बडवुनी । स्वातंत्र्याच्या नौबाति झडतिल ॥
राष्ट्रस्तव तरुणांचे तांडे । भर ईर्षेनें उड्या ठोकतिल ॥
बंधू भगिनी निर्भय होउनि । हिंद भूमिची सेवा करतिल ॥
भिडवुनि खांदा खांद्याला जन । राष्ट्रीय झेंडा घेउनि फिरतील ॥

## पद ८ वें.

हिंदि जनहो बोला आतां मंत्र वंदे मातरम् ।
शुद्ध सुंदर अति मनोहर मंत्र वंदे मातरम् ॥ धृ० ॥
वीर सारे व्हा लढाया पूर्ण स्वातंत्र्या वरा ।
देह सजवायास आतां शुद्ध खादी वापरा ॥
माल सोडा तो विदेशी दैन्य आलें भारता ।
दारु सोडा सर्वनाशी व्यर्थ कां हो प्राशितां ॥
वीर वहु गेले तुरुंगीं स्वस्थ कैसे बैसलां ।
दुष्ट कानू सर्व मोडा मंत्र गांधींनी दिला ॥
मिळवुनीया स्वातंत्र्याला मातृभूमि उद्धरा ।
नाशुनी सैतानी सत्ता ताप जगताचा हरा ॥

## पद ९ वें.

धन्य गांधीजी तो रणगाजी धन्यचि नेहरूजी ।
प्रेमें आजी स्वातंत्र्याचा पोवाडा गाजी ॥
गांधी नेहरू लढति मिठागरीं स्वातंत्र्यासाठीं ।
लढतां लढतां दोघेहि पडले शत्रूंच्या हातीं ।
खादी वापरा व्यसने सोडा स्वातंत्र्या गाठा ।
दारू सोडा कां पीता तो नरकाचा साठा ॥
उठा मर्द हो प्रभातकालीं निश्चय हाच करा ।
ध्येया गाठा स्वातंत्र्याच्या देशा उद्धारा ॥

## पद १० वें.

नव हिंद राष्ट्र झेंड्या । प्रणामा घेया ।। ध्रु० ।।
हिंद भूमिच्या हिंदि जनांच्या । स्वाभिम न चिन्हां ।।प्र० ।।
स्वराज्य माझें मीही त्याचा । जगता सांगाया ।।
स्वातंत्र्याच्या वाऱ्या वरतीं । बा फडफडणाऱ्या ।।
हिंदपुत्रहे सिद्ध तुझ्यास्तव । प्राणही अर्पाया ।।
नव्यामनूचे सीलेदारहे । नमिती तुजला या ।।

## पद ११ वें.

सम स्त सज्ज झाला । सत्याग्रही निघाला
मोहीम रोखुनीया
रणशूर घेऊनीया
संग्राम झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ।। १ ।।
सामर्थ्य वर्धवोनी
जगतास चेतवोनी
काळाशीं खेळण्याला । सत्याग्रही निघाला ।। २ ।।
सत्या समान नाहीं
जगीं वंद्य अन्य कांहीं
पुरुषार्थ प्रेरण्याला । सत्याग्रही निघाला ।। ३ ।।
श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर
सेनानीं क्रांतिकार
स्वातंत्र्य घोषणेला । सत्याग्रही निघाला ।। ४ ।।
आध्यात्म योग भारे
विश्वास जो भरारे

स्वातंत्र्य सेवनाला । सत्याग्रही निघाला ॥ ५ ॥
योगींद्र तो महात्मा
जो हिंद देश आत्मा
थरकावी जगाला । सत्याग्रही निघाला ॥ ६ ॥
यशवंत वीर माझा
विजयी करूनि काजा
हा आश्रमांत यावा । सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥

## पद १२ वें.

परवशतेचा काळ खरोखर,
झडकरी हो सरणार,
अंबरी स्वराज्य रवी येणार ।
भारत देशा, अखिल दुर्दशा
क्षणामधिं पळणार
तुझा तूं धनी स्वतः होणार ।
छाति कुणाची तुला देखण्या,
नच कधिंहि धजणार
शत्रू मनांत थरथरणार ।
विभवयुक्त तव पराक्रमाचा
डंका दुमदुमणार
जगाला वचक सदा देणार

स्वराज्य रवि तो अंबरी येतां।

प्रसन्नता रमणार

झेंडा अखंड फडफडणार

स्वराज्य रविच्या चंड प्रतापे

धूक अखिल पळणार

सारे चंडोलहि गाणार

स्वराज्य रविच्या एक कटाक्षे

अशुभ तुझे जळणार

विजया देवी लखलखणार।

स्वराज्य रविच्या कृपा प्रसादें

स्वतंत्रता येणार

शौर्य त्रिखंड ते घुमणार।

स्वराज्य देविच्या स्वतंत्रेच्या

कालामधिं होणार

पुनरपि सुवर्ण भू दिसणार।

कवि:—सरोज सुहृद

## पद १३ वें.

स्वस्थ कसा निजसी । भारता । ऊठ किती निजसी ॥
स्वातंत्र्य रवि उगवे हा बघ । करीं स्वागतासी ॥ धृ० ॥
भूमाता ही विह्वल झाली असह्य परदास्यीं ॥
हाक तियेची आर्यसुता तुज ऐकूं ये न कशी ॥ १ ॥
अमेरिका इंग्लंड भोगिती अतुल वैभवासी ॥
दुर्दैवि परी हिंद भूमि ही अजुनी परदास्यीं ॥ २ ॥
वृद्ध महात्मा गांधी शौर्यें ठाके युद्धासी ॥
परी हाय ! तूं तरुण भारता उदासीन दिससी ॥ ३ ॥
परसत्ता बहु मदांध झाली करी थैमानासी ॥
कितिक वीर निजपदीं तुडविले उघडीं नयनांसी ॥ ४ ॥
वल्लभभाई, बजाज, नेहरू आणिक गांधीसी ॥
कारागारीं बळें कोंडिलें सकलही वीरांसी ॥ ५ ॥
स्वातंत्र्यास्तव पेशावर तें रचो स्वयज्ञासी ॥
देशभक्तिची ज्वाळा ही बघ चमके आकाशीं ॥ ६ ॥
तोफा बंदुक गाळ्या घेती झेलुन हृदयाशीं ॥
स्वातंत्र्याचा घोष करोनी चढती स्वर्गासी ॥ ७ ॥
सत्याग्रह स्वातंत्र्यरणीं या कपट न कवणाशीं ॥
दुखवुं न कवणा कष्ट भोगितां अर्पुंहि स्वतनूसी
धर्म युद्ध हें अद्‌भुत वीरा शौर्यें जरि लढसी ॥
स्वराज्य वैभव भोगिशील वा ईशपदा चढसी ॥ ९ ॥
ऊठ ! ऊठ ! ! सावध हो आतां त्यजीं आळसासी ॥
रक्त उसळुं दे बाहु स्फुरूं दे धांव संगरासी ॥ १० ॥

—नाथ.

## पद १४ वें.

उठा बंधुनो स्वातंत्र्याचें युद्ध सुरू झालें,
उठा भगिनीनो स्वातंत्र्याचे युद्ध सुरू झालें ।
नच सामिल व्हाल तरी मग सर्वां मरणची ओढवलें ॥ १ ॥
थोर पुढारी कैद करुनिया आव्हानाचि दिधलें ।
त्याचे उत्तर देउनि आह्मी तयासि नमविले ॥ २ ॥
नोकरशाही थंड न राही हीच करि हल्ले ।
नच डगमगतां असंख्य वीरचि समरांगणी आले ॥ ३ ॥
स्वातंत्र्याच्या तोफा डागुनि किल्ला सर केला ।
जिकडे तिकडे धूर उसळला शत्रू गुदमरला ॥ ४ ॥
अबला सबला प्रबल होऊनि मुले स्वैर गाति ।
फडशा करुया साम्राज्याचा मिळेल मग मुक्ति ॥ ५ ॥
काकडी चोरा फाशी देती खुनी वंद्य ठरति ।
लुटारु असा न्याय देती । दरोडे खोर राज्य करती ।
यांया हकलुनि तया सिद्ध व्हा नच घ्या विश्रांति ॥ ६ ॥

## पद १५ वें.

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥ ध्रु० ॥

मलमल जो है विदेशी । आणे को गज मिलेगा ॥
खादी नहि त्यजोंगे ॥ लेंगे० ॥ १ ॥

बहोत्तर करोड रुपिया । परदेश जा रहे है ॥
उसकू बचा बचाके । लेंगे० ॥ २ ॥

चरखोंकि घणघणाट । रणभेरि या बजेंगे ॥
अंग्रेज को सुनाके । लेंगे० ॥ ३ ॥

या हक्क है हमारा । तनजानसेबि प्यारा ॥
मरणें नही डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥

हम सब परेड फौजी । कप्तान् हमारा गांधी ॥
आज्ञा उसीकि लेंगे । लेंगे० ॥ ५ ॥

तेहतीस करोड फौजी । रण सांथ ए चलेंगे ॥
गांधी हुकुम करेंगे । लेंगे० ॥ ६ ॥

चरखा ही तोफ बनेंगे । तकवा बने है बरची ॥
गोलेसे सूत्रके हम् । लेंगे० ॥ ८ ॥

## पद १६ वें.

वंदू निशाणा भारतिच्या पंचप्राणा ।
आत्मिकबल हें आहे श्रेष्ठ ॥
नोकरशाही करण्या नष्ट ।
हिंदामाजी होई प्रविष्ट ॥ गांधी राणा ॥
भारतिच्या पंचप्राणा ॥ ध्रु० ॥
असहकारिता पहिलें शस्त्र ।
भंग कायदा अचूक अस्त्र ॥
सत्याग्रह अणि स्वदेशी वस्त्र ।
जोडुया बाणा ॥ २ ॥
सोडा दारू, माल विदेशी ।
घ्याहो खादी शुद्ध स्वदेशी ॥
परके भिऊनी पळतिल देशी ।
करित ठणाणा ॥ भार० ॥ ३ ॥
हिंदु मुसलमिन् झगडा सोडा ।
करबंदीचा हांका गाडा ॥
स्वतंत्र करुनि बसवा पगडा ।
हिंदुस्थाना ॥ भारतिचा ॥ ४ ॥

# रणगीत

## राग-माढ

गगने गाजेरे, गगने गाजे ।
गुरु गांधीजीनी हांक गगने गाजे ॥ध्रु०॥
पाषाणनें पण आभे उडाडतां ।
मडदाने पण माटीमांथी उठाडता ॥
शूरा सामंतना पडघम वाजे ॥ गुरु० ॥
जन्म देणारीनुं दुध दिपाववा ।
मातृ भूमिनुं कुग शोभाववा ॥
माथां मेदानमां मांडो आजे ॥ गुरु० ॥
जिवता होईये तो जंगे झुकाविये ।
मीठुं जो होय तो मीठुं पकाविये ॥
नहितर एको तेर पेढी लाजे ॥ गुरु० ॥
सरकारना नाशनी नोबत वागेछे ।
मुक्ति मैय्या महा भोग मागेछे ॥
मस्तक छेदाय तो धडथी धाजे ॥ गुरु० ॥
परदेशी राजना पाया ढोलावतो ।
युवती युवानने पडतो बोलावतो ॥
भारतनो बावटो अगनम राजे ॥ गुरु० ॥
रणमां हिंदीना लोही रेलावशे ।
भेदी भेदी शीर श्रीफळ खेलावशे ॥
पडशे संचरवुं शबनी पाजे ॥ गुरु० ॥
कुमारीका पण मांडे केसरीया ।
पीठी भर्या पण रणे सचर्या ॥
भारत मैयानी मुक्ति काजे ॥ गुरु० ॥

प्रकाशक:—श्रीकांत दि. पालेकर,
कॉंग्रेस हाऊस समोर शिंघाणी हाऊस,
गिरगांव बॅकरोड, मुंबई.



कै. सीताकान्त यांच्या आरोग्यविषयक
सर्व पुस्तकांचे सार

# आरोग्य-साधन

किं. ४ आणे

प. शि. लोटलीकर, मुंबई नं. ४.

Printed by A. J. Avde at the
New Manohar P. Press, Girgaon Back
Road, Bombay No. 4.